# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम जिल्हा वाशिम 0721

राष्ट्रीय सेवा योजना पथक

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्लास्टिक मुक्त कॅम्पस गोटे महाविद्यालयाचा उपक्रम

संक्षिप्त अहवाल

**Date-20/08/2022**

# मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम जिल्हा वाशिम
## राष्ट्रीय सेवा योजना पथक
भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
# प्लास्टिक मुक्त कॅम्पस गोटे महाविद्यालयाचा उपक्रम
## संक्षिप्त अहवाल
**Date-20/08/2022**

---

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्याद्वारे दिनांक 20 ऑगस्ट 2022 ला प्लास्टिक मुक्त कॅम्पस हा उपक्रम राबविण्यात आला. प्लास्टिक हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झाल्याचे आज सर्वत्र दिसत आहे. परंतु ज्या प्लास्टिकचे किती घातक परिणाम पर्यावरणा सोबतच मानवावर, प्राण्यावर होत आहेत त्याला कुठेतरी आळा घालणे आवश्यक आहे. यासाठी याची सुरुवात गोटे महाविद्यालयातील कॅम्पस पासून करण्यात आली आहे. येथील कॅम्पस प्लास्टिक मुक्त करण्याचा संकल्प राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी केला आहे. आठवड्यातील प्रत्येक शनिवारी रासेयोचे विद्यार्थी प्लास्टिक एकत्र करून ते थेट रिसायकल करणाऱ्या कंपन्यांना देण्यात येणार आहे. तसेच प्लास्टिक न वापरण्याचे आव्हान देखील सर्वांना केले जात आहे. प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगावचे अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे यांनी आपल्या मार्गदर्शनात एका अंदाजानुसार

आपण दरवर्षी ५००० कोटी प्लास्टिक पिशव्या वापरतो आणि फेकून देतो तसेच दर मिनिटाला दहा लाख प्लास्टिक बॉटल्स विकल्या जातात. दुसरी एक आकडेवारी सांगते की, फक्त गेल्या एक वर्षात तब्बल ५१ ट्रिलियन प्लास्टिकच्या सूक्ष्म कणांनी समुद्राला दूषित केले आहे. ही संख्या आपल्या आकाशगंगेतील ताऱ्यांच्या संख्येपेक्षा पाचशे पटीहून अधिक असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. जी एस कुबडे यांनी आपल्या मार्गदर्शन या जगात मानवनिर्मित “सर्वव्यापी” अशी काही गोष्ट आहे, तर ती म्हणजे प्लास्टिक व यामुळे होणारे प्रदूषण आपल्या समुद्रात, जमिनीवर, हवेत आणि अवकाशात सुद्धा; जणू काही त्याच्या शिवाय काही चालणारच नाही. गेल्या ६०–७० वर्षांच्या छोट्या कालखंडात कापड, स्वयंपाक घर आणि केटरिंग पासून ते किरकोळ वस्तू, उत्पादनाचे डिझाईन व अभियांत्रिकी कामांपर्यंत सर्वकाही प्लास्टिकने व्यापलेले आहे.प्लास्टिकचे दीर्घायुष्य हा त्याचा सर्वात मोठा गुण समजला जायचा, तोच आज आपल्या पृथ्वीसाठी सर्वात मोठा अभिशाप बनल्याचे सांगितले.

प्लास्टिक मुक्त कॅम्पस या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही. बी. चांदजकर, डॉ पी जे गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना पथकाने केले. त्यात पवन नेमाडे, समाधान राजगुरू, गटप्रमुख अशोक

गुडदे, शुभम लांडकर, अभिषेक वैद्य, अनंता इंगळे, प्रज्वल जीचोटे, साक्षी सावळे, पूजा डोंगरदिवे, आरती भालेराव विजया खंदारे, राधा ठाकरे, अंजली वानखेडे अनंत इंगळे वैष्णवी ठाकरे आदींनी अथक परिश्रम घेतले




प्लास्टिक मुक्त कॅम्पस या उपक्रमामध्ये सहभागी रासयोचे विद्यार्थी

देशोन्नती

# प्लास्टिक मुक्त कॅम्पस गोटे महाविद्यालयाचा उपक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्याद्वारे २० ऑगस्ट २०२२ ला प्लास्टिक मुक्त कॅम्पस हा उपक्रम राबविण्यात आला. प्लास्टिक हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झाल्याचे आज सर्वत्र दिसत आहे. परंतु ज्या प्लास्टिकचे किती घातक परिणाम पर्यावरणा सोबतच मानवावर, प्राण्यावर होत आहेत त्याला कुठेतरी आळा घालणे आवश्यक आहे.

यासाठी याची सुरुवात गोटे महाविद्यालयातील कॅम्पस पासून करण्यात आली आहे. येथील कॅम्पस प्लास्टिक मुक्त करण्याचा संकल्प



राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी केला आहे. आठवड्यातील प्रत्येक शनिवारी रासेयोचे विद्यार्थी प्लास्टिक एकत्र करून ते थेट रिसायकल करणाऱ्या कंपन्यांना देण्यात येणार आहे. तसेच प्लास्टिक न वापरण्याचे आव्हान देखील सर्वांना केले जात आहे. प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगावचे अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे यांनी आपल्या मार्गदर्शनात एका अंदाजानुसार आपण दरवर्षी ५००० कोटी प्लास्टिक पिशव्या वापरतो आणि फेकून देतो तसेच दर मिनिटाला दहा लाख प्लास्टिक बॉटल्स विकल्या जातात. दुसरी एक आकडेवारी सांगते की, फक्त गेल्या एक वर्षात तब्बल ५१ ट्रिलियन प्लास्टिकच्या सूक्ष्म कणांनी समुद्राला दूषित केले आहे. ही संख्या आपल्या आकाशगंगेतील ताऱ्यांच्या संख्येपेक्षा पाचशे पटीहून अधिक असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. जी एस कुबडे यांनी आपल्या मार्गदर्शन या जगात मानवनिर्मित ‌‌सर्वव्यापी‌ अशी काही गोष्ट आहे, तर ती म्हणजे प्लास्टिक व यामुळे होणारे प्रदूषण आपल्या समुद्रात, जमिनीवर, हवेत आणि अवकाशात सुद्धा; जणू काही त्याच्या शिवाय काही चालणारच नाही. गेल्या ६०-७० वर्षांच्या छोट्या कालखंडात कापड, स्वयंपाक घर आणि केटरिंग पासून ते किरकोळ वस्तू, उत्पादनाचे डिझाईन व अभियांत्रिकी कामांपर्यंत सर्वकाही प्लास्टिकने व्यापलेले आहे. प्लास्टिकचे दीर्घायुष्य हा त्याचा सर्वात मोठा गुण समजला जायचा, तोच आज आपल्या पृथ्वीसाठी सर्वात मोठा अभिशाप बनल्याचे सांगितले.

प्लास्टिक मुक्त कॅम्पस या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही. बी. चांदजकर, डॉ पी जे गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना पथकाने केले. त्यात पवन नेमाडे, समाधान राजगुरू, गटप्रमुख अशोक गुडदे, शुभम लांडकर, अभिषेक वैद्य, अनंता इंगळे, प्रज्वल जीचोटे, साक्षी सावळे, पूजा डोंगरदिवे, आरती भालेराव विजया खंदारे, राधा ठाकरे, अंजली वानखेडे अनंत इंगळे वैष्णवी ठाकरे आदींनी अथक परिश्रम घेतले. (ता.प्र.)

Washim Edition
Aug 22, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

वाघोली बुलेटीन

# गोटे महाविद्यालयाकडून प्लास्टिक मुक्त उपक्रम

## राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी केला प्लास्टिक मुक्तचा संकल्प



> “ प्लास्टिक हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून मानवासह प्राण्यांवर याचा घातक परिणाम होत आहे. पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे दर शनिवारी प्लास्टिक मुक्त उपक्रम राबविण्यात येणार आहे.
>
> **- डॉ. पांडुरंग गोटे**

**वाशीम : प्रतिनिधी**

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे प्लास्टिक मुक्त कॅम्पस उपक्रम राबविण्यात आला असून दर शनिवारी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

प्लास्टिक हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झाल्याने प्लास्टिकचे घातक परिणाम पर्यावरणाबरोबरच मानवासह प्राण्यांवर सुद्धा होत आहेत. पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे शनिवार (दि. २० ऑगस्ट) रोजी प्लास्टिक मुक्त कॅम्पस उपक्रमाला सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील कॅम्पस मधील प्लास्टिक बॉटल्स, प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. संकलित केलेला प्लास्टिक कचरा रिसायकल केलेल्या कंपन्यांना देण्यात येणार आहे. हा उपक्रम दर शनिवारी राबवून प्लास्टिक मुक्त कॅम्पस व परिसर करण्याचा संकल्प राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी केला आहे. दरम्यान प्लास्टिक न वापरण्याचे आवाहन देखील विद्यार्थ्यांकडून करण्यात आले आहे.

एका अंदाजानुसार दरवर्षी ५००० कोटी प्लास्टिक पिशव्या वापरण्यात येत असून दर मिनिटाला दहा लाख प्लास्टिक बॉटल्स विकल्या जाता तर दुसऱ्या आकडेवारी नुसार मागील एक वर्षात तब्बल ५१ ट्रिलियन प्लास्टिकच्या सूक्ष्म कणांनी समुद्राला दूषित केले आहे. ही संख्या आकाशगंगेतील ताऱ्यांच्या संख्येपेक्षा पाचशे पटीहून अधिक असल्याचे प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगावचे अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. मानवनिर्मित प्लास्टिकचा सर्वत्र वापर होत असून दीर्घायुष्य असणारे प्लास्टिक पृथ्वीसाठी मोठा अभिशाप ठरला असल्याचे प्राचार्य डॉ. जी एस कुबडे यांनी सांगितले.

प्लास्टिक मुक्त कॅम्पस या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही बी चांदजकर तसेच डॉ. पी जे गोटे यांच्या मार्गदर्शनाखाली राजीव पथकाने केले. यामध्ये पवन नेमाडे, समाधान राजगुरू, गटप्रमुख अशोक गुडदे, शुभम लांडकर, अभिषेक वैद्य, अनंता इंगळे, प्रज्वल जीचोटे, साक्षी सावळे, पूजा डोंगरदिवे, आरती भालेराव विजया खंदारे, राधा ठाकरे, अंजली वानखेडे, वहिनी इंगळे, वैष्णवी ठाकरे आदींनी परिश्रम घेतले.

Wagholi Bulletin
Pune, Aug 21, 2022